"महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस (CBG) धोरण , २०२६"

# महाराष्ट्र शासन
## नगर विकास विभाग
## शासन निर्णय क्रमांक : स्वमअ-२०२५/प्र.क्र.८१/नवि-३४
## मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
## दिनांक : ०५ मे, २०२६

**प्रस्तावना :**

कचऱ्यापासून शाश्वत व विकेंद्रित ऊर्जा निर्मिती उपायांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध आहे. सदर धोरणांतर्गत नागरी सेंद्रिय, कृषी व इतर जैवविघटनशील कचऱ्याचा कच्च्या मालाच्या स्वरूपात वापर करून त्यापासून कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सी.बी.जी.) तयार करण्यात येणार आहे. नागरी भागातील कचऱ्याचे विलगीकरण, संकलन, प्रक्रिया व त्याचे स्वच्छ उर्जेमध्ये रूपांतर करण्यासाठी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्षम करणे, कॉम्प्रेस्ड बायोगॅस उत्पादनास व नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रणालीच्या एकत्रीकरणास चालना देणे, घनकचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी लागणाऱ्या जागेवरील भार कमी करणे, सार्वजनिक आरोग्य सुधारणा करणे तसेच हरितगृह वायू उत्सर्जन कमी करून वातावरणाची गुणवत्ता वाढविणे हे या धोरणामागील प्रमुख उद्दिष्ट आहे.

शेतातील कचरा उघड्यावर जाळणे व नागरी घनकचऱ्याचा कमी प्रमाणात पुनर्वापर यामुळे निर्माण होणारी पर्यावरणीय व आर्थिक आव्हाने विचारात घेता, जैवऊर्जा निर्मितीसाठी संरचित दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. नागरी घनकचरा व कृषी कचरा या स्रोतांवर आधारित कॉम्प्रेस्ड बायोगॅस उपक्रमांना प्रोत्साहन दिल्यास जमिनीचा ऱ्हास, वायू प्रदूषण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेची कुंठितता कमी होण्यास मदत होईल. तसेच, कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पांमुळे चक्रीय अर्थव्यवस्थेस चालना मिळून शेतकऱ्यांना पूरक उत्पन्न, ग्रामीण रोजगार आणि राज्याच्या ऊर्जा सुरक्षिततेस हातभार लागेल.

प्रस्तावित धोरणाव्दारे विद्यमान नियामक चौकट सुलभ करण्याची आणि कॉम्प्रेस्ड बायोगॅस उत्पादनासाठी पशुधन कचरा, बाजारातील कचरा आणि साखर कारखान्यातील उप-उत्पादने इत्यादींसह विविध प्रकारच्या सेंद्रिय कचऱ्याच्या वापरास प्रोत्साहन देण्याची आवश्यकता देखील अधोरेखित करण्यात येत आहे. कॉम्प्रेस्ड बायोगॅस निर्मिती प्रणालीच्या विकासाव्दारे जीवाश्म इंधनांवरील आपले अवलंबित्व कमी करणे, ऊर्जा स्वावलंबन वाढवणे आणि शाश्वत शहरी आणि ग्रामीण विकासाला राज्य प्रोत्साहन देईल. सदर धोरण सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील विविध भागधारकांना राज्यात स्वच्छ, हरित व शाश्वत उर्जेचा स्त्रोत निर्माण करण्यासाठी मार्गदर्शक दस्तऐवज म्हणून काम करेल.

"महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरण, २०२६" धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विविध स्तरावरील समित्या, संस्थात्मक व वित्तीय चौकट सुनिश्चित करण्यास दिनांक २२ एप्रिल, २०२६ रोजी मा. मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरणाबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :

या शासन निर्णयान्वये "**महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरण, २०२६**" निश्चित करण्यात येत असून त्याची उद्दिष्ट पुढील प्रमाणे आहेत :-

अ) औद्योगिक, वाहतूक व घरगुती वापरासाठी स्वच्छ, नवीकरणीय व स्वदेशी इंधनाचा पर्याय म्हणून कॉम्प्रेस्ड बायोगॅसच्या उत्पादन व वापराला प्रोत्साहन देणे.

ब) नागरी घनकचरा, कृषी अवशेष, पशुधन कचरा, कृषी उत्पन्न बाजारातील कचरा व साखर उद्योगातील अवशेष यांचा वापर करून कॉम्प्रेस्ड बायोगॅस निर्मितीला चालना देणे, तसेच उघड्यावर कचरा जाळण्याचे प्रमाण कमी करून पर्यावरणीय प्रदूषण कमी करणे.

क) शेतकऱ्यांना कृषी अवशेष व जैविक कचऱ्याच्या मूल्यवर्धनातून अतिरिक्त उत्पन्न उपलब्ध करून देणे व ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणे.

ड) कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पांच्या स्थापनेद्वारे ग्रामीण व शहरी भागात रोजगार निर्मिती व उद्योजकतेस प्रोत्साहन देणे.

इ) महाराष्ट्राचे जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व कमी करून भारताच्या सन २०७० पर्यंत निव्वळ शून्य कार्बन उत्सर्जन साध्य करण्याच्या उद्दिष्टाला हातभार लावणे.

फ) उच्च बायोमास उपलब्धता असलेल्या भागांमध्ये आवश्यकतेनुसार कॉम्प्रेस्ड बायोगॅस क्लस्टर (CBG hubs) विकसित करून कच्चा माल संकलन, प्रक्रिया व वितरणासाठी एकात्मिक पायाभूत सुविधा निर्माण करणे.

ग) बायोमास व सेंद्रिय कचऱ्याच्या शाश्वत पुरवठ्यासाठी संकलन, साठवणूक व वाहतूक यांची पुरवठा साखळी (supply chain) सक्षम करणे.

च) जैवऊर्जा क्षेत्रात संशोधन, नवोपक्रम व आधुनिक तंत्रज्ञान (जसे की ॲनएरोबिक डाइजेशन, गॅस शुद्धीकरण व बायो-खत पुनर्प्राप्ती) यांना चालना देणे.

छ) सार्वजनिक-खाजगी भागीदारी, खाजगी गुंतवणूक व उद्योजकांना पोषक धोरणात्मक वातावरण निर्माण करणे.

ज) नापीक व अनुपयोगी जमिनीवर ऊर्जा पिके, नॉन-एडिबल ऑइल सीड्स इत्यादींच्या लागवडीद्वारे पर्यायी कच्चा माल निर्मितीला प्रोत्साहन देणे.

सदर धोरण खालील योजना/उद्दिष्टांशी सुसंगत आहे:

१. स्वच्छ महाराष्ट्र अभियान,

२. राष्ट्रीय जैव-ऊर्जा व कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरण, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार,
३. शाश्वत विकास उद्दिष्टे – SDG (Sustainable Development Goals) ७, ११ व १३,
४. सन २०७० पर्यंत नेट-झिरो संकल्पाबाबत राज्याची बांधिलकी.

**धोरणाची व्याप्ती**

हे धोरण राज्यातील कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पांच्या विकास, वित्तपुरवठा, संचालन आणि देखभालीमध्ये कार्यरत असणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (ULBs), सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (PSUs), तेल आणि वायू विपणन कंपन्या (OGMCs) आणि या क्षेत्राशी संबंधित खाजगी क्षेत्रातील संस्था (PSEs) यांना लागू असेल.

धोरणाच्या व्याप्तीमध्ये पुढील बाबींचा समावेश असेल.

अ) भागधारकः

१. राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था.
२. ऊर्जा, कचरा व्यवस्थापन किंवा पायाभूत सुविधा विकासात सहभागी असलेले केंद्र आणि राज्य शासनाचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (PSUs).
३. कॉम्प्रेस्ड बायोगॅसच्या खरेदी आणि वितरणाच्या तेल आणि वायू विपणन कंपन्या (OGMCs).
४. खाजगी विकासक, तंत्रज्ञान पुरवठादार जैव उर्जा किंवा कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती क्षेत्रात तज्ञ व कार्यरत असणारे खाजगी क्षेत्रातील विकासक तंत्रज्ञान पुरवठादार व गुंतवणुकदार.
५. शेतकरी उत्पादक कंपन्या (FPOs), सहकारी संस्था, कृषी संकलक (Aggregators) आणि ग्रामीण उद्योजक, जे कच्चा माल संकलन व पुरवठा साखळीत सहभागी असतील.

ब) कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पांसाठी लागणारा कच्चा माल :

या धोरणांतर्गत विलगीकृत केलेला नागरी सेंद्रीय कचरा, शेती पिकांचे अवशेष, शेण आणि इतर जैवविघटनशील कृषी व औद्योगिक कचऱ्यापासून कॉम्प्रेस्ड बायोगॅस तयार करणारे प्रकल्प पात्र मानले जातील.

तसेच, कच्च्या मालाचा सातत्यपूर्ण व शाश्वत पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी विविध स्त्रोतांचे एकत्रिकरण (multi-feedstock approach) प्रोत्साहित करण्यात येईल.

कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पांसाठी आवश्यक कच्च्या मालाचा सातत्यपूर्ण व शाश्वत पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्या, गोशाळा, साखर कारखाने तसेच इतर कच्चा माल स्त्रोतांबरोबर दीर्घकालीन करार (Long-term Contracts) करण्यास प्रोत्साहन देण्यात येईल.

क) प्रकल्प व्यवहार्यता निकष :-

कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पाची व्यावसायिक व्यवहार्यता सुनिश्चित करण्यासाठी प्रकल्पाची किमान कार्यान्वयन क्षमता २० टन प्रति दिन (TPD) विलगीकृत नागरी सेंद्रीय कचरा अथवा एकत्रितपणे उच्च मिथेन घटक असणाऱ्या जैविक पद्धतीचे स्रोत उपलब्ध असणे आवश्यक आहे. उदा. कृषी अवशेष, नेपियर गवत, बाजार आणि मंडईतील कचरा. तसेच प्रकल्पासाठी कच्च्या मालाचा दीर्घकालीन आणि सातत्यपूर्ण पुरवठा सुनिश्चित करणे आवश्यक राहील.

या निर्धारित केलेल्या क्षमतेमुळे प्रकल्पाची कार्यक्षमता वाढीस लागते व आर्थिकदृष्ट्या किफायतशीर होतो. तसेच इतर घटक जसे की, गॅस शुद्धीकरण यंत्रणा, गॅस वितरण प्रणाली या सारख्या पायाभूत सुविधांमध्ये होणारी गुंतवणूक आर्थिक दृष्ट्या किफायतशीर होईल तसेच लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्था सामुहिकरित्या अशा निर्धारीत केलेल्या प्रकल्पाची क्षमता साध्य करु शकतील.

ड) प्रकल्पांचे प्रकार :-

१. संपूर्णपणे नविन (ग्रीनफिल्ड) आणि पुर्नविकसित (ब्राउनफिल्ड) कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्प.
२. कॉम्प्रेस्ड बायोगॅस उत्पादन युनिटसह घनकचऱ्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प.
३. नागरी स्थानिक स्वराज्य संस्था किंवा औद्योगिक क्षेत्राबरोबर भागीदारी असणारे विकेंद्रीत अथवा सामुहीक प्रकल्प.
४. क्लस्टर आधारित (CBG hubs) व कॅचमेंट एरिया आधारित प्रकल्प.

इ) भौगोलिक व्याप्ती :

सदर धोरण संपूर्ण राज्यासाठी लागू राहील. तथापि, यामध्ये उच्च बायोमास उपलब्धता असलेला भाग आणि तेल व वायू विपणन कंपन्यांची वितरण व्यवस्था असलेल्या भागाच्या जवळच्या क्षेत्रावर भर राहील. तसेच कच्च्या मालाच्या उपलब्धतेनुसार प्रकल्पांसाठी कॅचमेंट क्षेत्र निश्चित करण्यावर भर राहील.

फ) राष्ट्रीय योजनांशी सुसंगतताः

SATAT (Sustainable Alternative Towards Affordable Transportation), गोबरधन (Galvanizing Organic Bio-Agro Resources Dhan), स्वच्छ भारत अभियान नागरी आणि ग्रामीण आणि राष्ट्रीय जैव योजना अभियान या सारख्या राष्ट्रीय योजनांशी संबंधित असणाऱ्या प्रकल्पांना सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्राधान्य दिले जाईल.

घ) कच्चा माल पुरवठा साखळी (Feedstock Supply Chain):

कच्चा माल संकलन, साठवणूक व वाहतूक यासाठी शेतकरी, संकलक (aggregators) व प्रकल्प विकासक यांच्यामध्ये दीर्घकालीन करार प्रणाली विकसित करण्यात येईल. यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्म / व्यवस्थापन प्रणाली विकसित करण्यास प्रोत्साहन दिले जाईल. संकलक (aggregators) यांची नोंदणी, नियमन व कार्यप्रदर्शन मूल्यांकनासाठी स्वतंत्र यंत्रणा विकसित करण्यात येईल

शेण व कृषी कचऱ्याच्या पुरवठ्यासाठी किंमत निर्धारण (price discovery) व संकलनासाठी संस्थात्मक यंत्रणा विकसित करण्यात येईल.

छ) उप उत्पादनांचा वापर:

कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या जैवखताच्या विक्री व वापरासाठी कृषी विभागामार्फत नोंदणीकृत विक्री केंद्रांद्वारे वितरणास प्राधान्य दिले जाईल.

२. हे धोरण राबविण्यासाठी **नगर विकास विभाग हा नोडल विभाग** म्हणून कार्य करील. या धोरणाशी एककेंद्रीभूत असलेल्या इतर विभागांच्या योजना व संसाधनांच्या सक्षमीकरणासाठी सर्व संबंधित विभागांशी समन्वय साधेल. धोरणांतर्गत प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि विविध विभागांमध्ये समन्वय साधण्यासाठी व आवश्यकतेनुसार अंमलबजावणीयोग्य सुधारणा करण्यासाठी खालील प्रमाणे **मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सुकाणू समिती** कार्य करेल.

| अ. क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| १. | मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्रा | सह-अध्यक्ष |
| ३. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ४. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| ५. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, महसूल विभाग | सदस्य |
| ६. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, वन विभाग | सदस्य |
| ७. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, जलसंधारण विभाग | सदस्य |
| ८. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य |
| ९. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, ऊर्जा विभाग | सदस्य |
| १०. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, कृषी विभाग | सदस्य |
| ११. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १२. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग | सदस्य |
| १३. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग | सदस्य |
| १४. | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) | सदस्य |
| १५. | राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (शहरी) | सदस्य |
| १६. | राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ग्रामीण) | सदस्य |
| १७. | महा संचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्था (MEDA) | सदस्य |
| १८. | सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) | सदस्य |
| १९. | तेल आणि वायू विपणन कंपन्यांचे प्रतिनिधि (उदा. IOCL, BPCL, HPCL) | सदस्य |
| २०. | आयुक्त, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा | सदस्य |
| २१. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, नगर विकास विभाग (नवि -२), | सदस्य सचिव |

**राज्यस्तरीय सुकाणू समितीच्या भूमिका व जबाबदाऱ्या** -

- कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पांचे नियोजन करणे, कृती आराखडा मंजूर करणे, अंमलबजावणी व संनियंत्रण करणे.
- धोरणाच्या अंमबजावणीसाठी धोरणात्मक निर्णय घेणे तसेच संबंधित विविध विभागांमध्ये समन्वय साधणे.
- धोरणांमध्ये वेळोवेळी सुधारणा करणे तसेच प्रोत्साहन अनुदान देण्यासाठी नियम कार्यपध्दती आणि नियामक सुधारणा करण्यासाठी शिफारस करणे.
- प्रशासकीय पातळीवरील व अंमलबजावणी स्तरावर येणाऱ्या उच्च स्तरीय अडचणींचे निराकरण करणे.
- SATAT आणि GOBARDHAN या सारख्या राष्ट्रीय योजनांसोबत सांगड घालण्याची व्यवस्था करणे.
- कचरा संकलन करणाऱ्या संस्थांना कृषी कचऱ्याची वाहतूक करण्यासाठी व त्यासाठी आवश्यक विविध परवानग्या उपलब्ध होण्यासाठी नियामक सहाय्य करणे.

**३.** सदर धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, नगर विकास विभाग (नवि - २) यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती स्थापन करण्यात आली आहे.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **पद** |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, नगर विकास विभाग (न वि - २) | अध्यक्ष |
| २ | संचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्था (MEDA) | सदस्य |
| ३ | आयुक्त तथा संचालक (नगरपरिषद प्रशासन संचालनालय) | सदस्य |
| ४ | संबंधित सह/उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय | सदस्य सचिव |

**कार्यकारी समिती (Executive Committee) ची भूमिका आणि जबाबदाऱ्या**

- राज्यातील कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पांच्या अंमलबजावणीचा नियमित आढावा घेणे व प्रगतीचे संनियंत्रण करणे.
- प्रकल्प अंमलबजावणीदरम्यान उद्भवणाऱ्या प्रशासकीय, तांत्रिक व आर्थिक अडचणींचे त्वरित निराकरण करणे.
- विविध विभागांमध्ये समन्वय साधून धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे.
- प्रकल्प अंमलबजावणीसाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना व कार्यपध्दती निश्चित करणे.
- गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी व खाजगी क्षेत्रातील सहभाग वाढविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.
- प्रकल्पांच्या नोंदणी, मंजुरी व अंमलबजावणी प्रक्रियेमध्ये सुलभता आणणे.
- कच्चा माल पुरवठा साखळी व दीर्घकालीन करार व्यवस्थेचा आढावा घेणे.
- जिल्हास्तरीय समित्यांच्या (DBCC) कामकाजाचा आढावा घेऊन आवश्यक मार्गदर्शन करणे.
- आर्थिक सहाय्य व प्रोत्साहन योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.
- केंद्र शासनाच्या योजनांशी समन्वय साधणे.
- धोरणात आवश्यक सुधारणा करण्यासाठी शासनास शिफारसी करणे.
- सदर समितीच्या बैठकीसाठी आवश्यकतेनुसार राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी), मुंबई, संबंधित आयुक्त/ मुख्याधिकारी किंवा अन्य अधिकारी यांना निमंत्रित करता येईल.

४. सदर धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व जिल्हास्तरावर विविध विभागांमध्ये समन्वय साधण्यासाठी जिल्हा कॉम्प्रेस्ड समन्वय समिती (DBCC) राहील **जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली "जिल्हा कॉम्प्रेस्ड बायोगॅस समन्वय समिती"** स्थापन करण्यात आली आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ३ | महापालिका आयुक्त (संबंधित जिल्ह्यातील सर्व) | सदस्य |
| ४ | जिल्ह्यातील सर्व "अ" वर्ग नगरपरिषदांचे मुख्याधिकारी व सदस्य प्रकल्पाशी संबंधीत मुख्याधिकारी | सदस्य |
| ५ | जिल्हा कृषी अधिकारी | सदस्य |
| ६ | विभागीय वन अधिकारी | सदस्य |
| ७ | पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे कार्यकारी अभियंता/पदनिर्देशित प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी (जिल्हा स्तर ) | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ९ | MEDA चे प्रतिनिधी | सदस्य |
| १० | शेतकरी उत्पादक संघटनेचे (FPO) प्रतिनिधी | सदस्य |
| ११ | जिल्हास्तरीय अधिकारी, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा | सदस्य |
| १२ | जिल्हा सहआयुक्त (नगरपालिका प्रशासन) | सदस्य सचिव |

**जिल्हा कॉम्प्रेस्ड बायोगॅस समन्वय समिती (DBCC) ची भूमिका आणि जबाबदाऱ्या :-**

- कॉन्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पासाठी संभाव्य ठिकाणे आणि सामुहिक ठिकाणे सुनिश्चित करणे.
- जमीन वाटप, मंजूरी तसेच स्थानिक स्तरावरील समन्वय साधणे.
- क्षेत्रिय स्तरावर प्रकल्प अंमलबजावणी संनियंत्रण करणे.
- कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पासाठी कृषी उत्पादक संस्था किंवा सहकारी संस्था कचरा संकलक म्हणून काम करु शकतील. साधारणतः प्रत्येक पंचायत समिती स्तरावर एक संकलक असावा.
- जिल्हा कॉम्प्रेस्ड बायोगॅस समन्वय समितीच्या शिफारशीनुसार एकापेक्षा अधिक संकलकांची देखील नोंदणी करता येईल.
- लहान स्थानिक स्वराज्य संस्थांचे क्लस्टर स्थापन करण्यासाठी समन्वय साधणे.
- कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पांसाठी जमिनीचे वाटप प्रकल्पाच्या क्षमतेनुसार प्रति १ टन क्षमतेस अंदाजे १ एकर या प्रमाणात करण्यात येईल. तथापि, एकूण जमीन किमान १ एकर व कमाल २० एकर या मर्यादेत राहील.
- नगर विकास विभागाच्या दिनांक ६ नोव्हेंबर २०२३ च्या अधिसूचनेनुसार जमीन भाडेपट्टा दर रेडी रेकनर (RR) दराच्या ०.७% प्रमाणे आकारण्यात येईल. यामध्ये दर ३ वर्षांनी ५ टक्क्यांनी वाढवण्यात यावे. जमीन उपलब्धतेसाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राधान्याने कचरा व्यवस्थापनासाठी राखीव जागांचा वापर करण्यास निर्देशित करण्यात येईल. जमीन उपलब्ध करून दिल्यानंतर २ वर्षाच्या कालावधीमध्ये प्रकल्प कार्यन्वित न झाल्यास भाडेपट्याने जमिनीचे केलेले वाटप रद्द करण्यात येईल.
- प्रकल्पांसाठी व्यवहार्यता तफावत निधी (Viability Gap Funding - VGF) अनुदान प्रति टन कमाल रु. ७५ लाख या दराने देण्यात येईल, मात्र एकूण मर्यादा रु. १५ कोटी राहील.
- विकास आराखडा (DP) क्षेत्रातील तसेच शहर मर्यादेतील प्रकल्पांसाठी संबंधित जागा कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पासाठी सुसंगत झोनमध्ये असणे आवश्यक राहील.
- जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरून स्वारस्य अभिव्यक्ती (EoI) / निविदा (Bids) मागविण्यात येतील. प्रकल्पासाठी जमीन निवडताना स्थानिक स्वराज्य संस्था/नगरपालिका, प्रत्येक तालुक्यात एक कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्प विकसित करण्यावर भर देण्यात येईल व प्रकल्प स्थापन करताना जास्त सेंद्रीय कचरा उपलब्ध असलेल्या क्षेत्रांना प्राधान्य दिले जाईल. निविदा

प्रक्रियेमध्ये तांत्रिक क्षमता, कच्चा माल संकलन क्षमता व आर्थिक प्रस्ताव यांचा एकत्रित विचार करण्यात येईल.

- स्पर्धात्मक पद्धतीने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेला (ULB) प्रति टन विलगीकृत कचऱ्यासाठी जास्तीत जास्त शुल्क (Segregated Waste Processing Fee) देण्याची तयारी दर्शविणाऱ्या पात्र उद्योजकांची निवड करण्यात येईल.
- जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून संबंधित क्षेत्रातील शेतकरी उत्पादक संस्था (FPOs) शोधून कृषी अवशेष (उदा. कापूस अवशेष इ.) कच्चा माल म्हणून प्रकल्पांना उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात येईल.
- कॉम्प्रेस्ड बायोगॅस उत्पादन सुरू झाल्यानंतर राज्य वस्तू व सेवा कर (SGST) मधील २.५% रक्कम परतावा स्वरूपात देण्यात येईल.
- कृषी अवशेषांचे संकलन करणाऱ्या शेतकरी उत्पादक संस्था (FPOs) यांना केंद्र शासनाच्या यांत्रिकीकरण योजनेंतर्गत आवश्यक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल.
- प्रकल्पांसाठी कच्चा माल उपलब्धतेचे क्षेत्र (catchment allocation) निश्चित करून त्या क्षेत्रात इतर समान प्रकल्पांमधील स्पर्धा टाळण्याची जबाबदारी समितीवर राहील.

**जिल्हास्तरावर प्रकल्प सुविधा कक्ष :**

कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पांसाठी समर्पित सुविधा कक्ष स्थापन करण्यात येईल.

- ज्यामध्ये गुंतवणूकदार आणि विकासकास एक खिडकी सुविधा उपलब्ध होईल.
- प्रकल्पाचे काम सुरु असताना तात्काळ संनियंत्रण करण्यासाठी प्रकल्पाची माहिती सादर करण्याबाबतची डॅशबोर्ड सुविधा राहील.

**सार्वजनिक- खाजगी भागीदारी (PPP) :**

- सदर धोरण प्रकल्प विकास, कार्यान्वयन आणि देखभालीसाठी सार्वजनिक- खाजगी-भागीदारी (PPP) धोरणाचा (Model) अवलंब करण्यास प्रोत्साहन देते. पारदर्शकता आणि एकरुपता सुनिश्चित करण्यासाठी भागधारकांमधील करारनाम्याचे प्रारुप आणि आदर्श निविदा दस्तऐवज विकसीत करण्यात येतील.
- कॉम्प्रेस्ड बायोगॅसचा अंतिम वापरकर्त्यास पुरवठा होण्यासाठी कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पांकरीता पाईप लाईन, मीटर तसेच वितरण प्रणाली सारख्या पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करावी लागेल.
- विविध प्रकारचे विकासक व तंत्रज्ञान यांना मोठ्या प्रमाणात आकर्षित करण्यासाठी निविदा प्रारुप तयार करण्यात येईल. या बहु-निकष दृष्टीकोनामुळे जिल्हा आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना स्थानिक परिस्थिती व प्रकल्प उद्दिष्टानुरुप योग्य तो भागीदार निवडता येईल.

निविदाधारकाचे मुल्यांकन प्रामुख्याने खालील मानकनांवरच केले जाईल. तथापि, सदर मुल्यांकन खालील मानकनावरच मर्यादित असेल असे नाही.

१. टिंपिंग शुल्क आवश्यकता (विलगीकृत सेंद्रीय कचरा)
२. पायाभूत सुविधा गुंतवणूकीची हमी.
३. कच्चा माल एकत्रिकरण क्षमता.
४. पर्यावरणीय कामगिरी मानांकने,

**निविदा निकष :**

स्पर्धात्मक पद्धतीने स्थानिक स्वराज्य संस्थेला (ULB) प्रति टन विलगीकृत कचऱ्यासाठी टिंपिंग शुल्क हा निकष असेल.

**राष्ट्रीय योजनांची सांगड :**

कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्प केंद्र सरकारच्या खालील योजनांशी सुसंगत असतील

- SATAT (Sustainable Alternative Towards Affordable Transportation)
- गोबरधन (Galvanizing Organic Bio-Agro Resources Dhan)
- स्वच्छ भारत अभियान (नागरी आणि ग्रामीण)
- राष्ट्रीय जैव ऊर्जा अभियान

**संनियंत्रण आणि मूल्यांकन :**

प्रकल्पाच्या खालील घटकांच्या संनियंत्रणासाठी "संनियंत्रण आणि मूल्यांकन प्रणाली" विकसीत केली जाईल.

- कार्यान्वित केलेल्या कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पाची संख्या आणि क्षमता,
- प्रक्रिया केलेला कचरा तसेच उत्पादित केलेला कॉम्प्रेस्ड बायोगॅस यांचे परिमाण
- रोजगार निर्मिती आणि कार्बन उत्सर्जनात झालेली घट.
- प्रकल्पाची निष्पती आणि त्याअनुषंगाने जबाबदारी निश्चित करण्यासाठी राज्य आणि जिल्हा पातळीवर नियतकालिक आढावा.
- प्रकल्पांची कार्यक्षमता, गॅस उत्पादन, कचरा प्रक्रिया व कार्बन उत्सर्जन घट यावर आधारित प्रमुख कामगिरी निर्देशक (KPIs) निश्चित करण्यात येतील.

**नोंदणी प्रक्रिया :**

कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पाच्या विकासकाने आवश्यक कागदपत्रांसह विहीत कालमर्यादेत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करुन तसे नगर विकास विभागास कळवावे.

कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पासाठी पुरेसा बायोमास/कचरा नियमित उपलब्ध होण्यासाठी तसेच जिल्हयातील याच प्रकारच्या अन्य प्रकल्पांमध्ये बायोमास किंवा सेंद्रिय कचऱ्यासाठी स्पर्धा न होण्यासाठी कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्प नोंदणीकृत केला जाईल.

कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पांची क्षमता तसेच कचरा / बायोमासची आवश्यकता विचारता घेऊन जिल्हा कॉम्प्रेस्ड बायोगॅस समन्वय समिती पुरवठयाचे क्षेत्र लगतच्या पंचायतमध्ये वाढवू शकेल.

**जमीनचे वाटप :**

- शासकीय जमीन उपलब्ध असल्यास पर्यावरणीय आणि झोनिंग मंजुरीच्या अधीन राहून प्राधान्यक्रमाने भाडेपट्ट्यावर किंवा सवलतीच्या अटींवर कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रल्पासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.
- नागरी स्थानिक स्वराज्य संस्था विकेंद्रीत कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पासाठी रेडी रेकनरच्या दराने जागा उपलब्ध करुन देतील.

**वीज आणि पाणी पुरवठा :**

- कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्प हे प्राधान्यक्रम असलेले पायाभूत सुविधा विकास प्रकल्प गृहित घरुन त्यांना वीज व पाणी पुरवठा प्राधान्याने उपलब्ध करण्यात येईल.

**जलदगती मंजुरी :**

- जमीनीचा वापर, पर्यावरणाच्या दृष्टीने आवश्यक बाबींची पुर्तता तसेच पायाभूत सोयी सुविधांच्या जलद मंजूरीसाठी एक खिडकी योजना निर्माण केली जाईल.

**५. व्यवहार्यता तफावत निधी (VGF)**

- राज्य स्तरीय सुकाणू समितीच्या मूल्यांकन आणि मंजुरीच्या आधारे सामाजिक आणि पर्यावरणीय दृष्ट्या फायदेशीर परंतू आर्थिक दृष्ट्या किफायतशीर नसणाऱ्या प्रकल्पांना व्यवहार्यता तफावत निधी (VGF) सहाय्य दिले जाईल. यासाठी अर्थसंकल्पिय तरतुद करण्यात येईल.
- प्रस्तावित धोरणामध्ये प्रोत्साहनात्मक अनुदान जाहीर करताना केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या धोरणातील तरतुदीनुसार प्रति प्रकल्प तसेच प्रकल्प क्षमतेनुसार अनुदानाची कमाल मर्यादा निश्चित करण्यात येत आहे.
- राज्यस्तरीय सुकाणू समितीच्या मूल्यांकन व मंजुरीच्या आधारे सामाजिक व पर्यावरणीय दृष्ट्या फायदेशीर परंतु आर्थिकदृष्ट्या किफायतशीर नसणाऱ्या प्रकल्पांना व्यवहार्यता तफावत निधी (VGF) अंतर्गत सहाय्य देण्यात येईल.
- राज्य शासनाकडून VGF अनुदान प्रकल्पाच्या क्षमतेनुसार प्रति टन कमाल रु. ७५ लाख या दराने देण्यात येईल. तथापि, प्रति प्रकल्प राज्य शासनाच्या VGF अनुदानाची एकूण मर्यादा रु. १५ कोटी (किंवा शासनाने वेळोवेळी निश्चित केलेली मर्यादा) राहील.

- या योजनेकरिता व्यवहार्यता तफावत निधी (VGF) अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र लेखशीर्ष उघडून सन २०२६-२७ या वर्षाकरिता रु. ५०० कोटींची तरतूद करण्यात येईल.

**६. हा प्रकल्प राबविण्यासाठी लागणाऱ्या जमिनीची उपलब्धता खालील प्रमाणे करण्यात येईल :-**

- कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्प राबविण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे कचरा व्यवस्थापनासाठी उपलब्ध असलेली जमीन महानगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायती प्रचलित नियमानुसार भाडेपट्ट्याने देण्यात येईल. जमीन उपलब्ध करून दिल्यानंतर २ वर्षाच्या कालावधीमध्ये प्रकल्प कार्यान्वित न झाल्यास भाडेपट्याने जमिनीचे केलेले वाटप रद्द करण्यात येईल.
- सदर जमिनीचा भाडेपट्टा दर नगर विकास विभागाच्या प्रचलित अधिसूचनेनुसार संबंधित जमिनीच्या रेडी रेकनर (RR) दराच्या ०.७% प्रमाणे आकारण्यात येईल. यामध्ये दर ३ वर्षांनी ५ टक्क्यांनी वाढवण्यात यावे.
- हा प्रकल्प राबविण्यासाठी फीडस्टॉक क्षमतेनुसार प्रमाणित रचना (Standard Layout) निश्चित करण्यात येईल. २० TPD क्षमतेच्या प्रकल्पासाठी कॉम्प्रेस्ड बायोगॅस निर्मिती क्षमता सुमारे १.५ MMSCMD राहील. तसेच प्रकल्पासाठी आवश्यक कमाल जमीन २० एकर इतकी निश्चित करण्यात येईल.

**७.** कॉम्प्रेस्ड बायोगॅसच्या ठोक उपभोक्त्याच्या (Bulk Buyer), गरजेनुरूप कॉम्प्रेस्ड बायोगॅसची आवश्यक गुणवत्ता मिळवण्याकामी (Fit for Use) व्यवहार्य तंत्रज्ञान व बायोमास उपयोगात आणून प्रकल्प उभारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

८. कॉम्प्रेस्ड बायोगॅस तयार करण्याचे प्रकल्प सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्त्वावर/ हायब्रीड ॲन्युटी मोडवर राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे

**९.** सदर शासन निर्णयातील तरतुद संदर्भात काही शंका निर्माण झाल्यास त्या बाबत अर्थ लावण्याचा अधिकार शासनास राहील व त्या बाबतचा शासनाचा निर्णय अंतिम राहील.

**१०.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५०५१५५७५५४३२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ANIRUDDHA
VENKTESH JEWLIKAR

Digitally signed by ANIRUDDHA VENKTESH JEWLIKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=29C6C42B5811A121A201ECD7ACEAAC3251C7D1DED31FF1B6E1A88D86B600C6BD,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=B986D51C7C29938C2BBB53D563F07DFC61C84B730CB9118407ECAB6A27C67C4
C, cn=ANIRUDDHA VENKTESH JEWLIKAR
Date: 2026.05.05 15:59:30 +05'30'

**(अनिरुद्ध जेवळीकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल महोदयांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्य मंत्री तथा मंत्री नगर विकास यांचे अपर मुख्य सचिव , मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्य मंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव.
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव, उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव, महसूल व वने विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई
१६. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई
१७. विभागीय आयुक्त, महसूल विभाग (सर्व),
१८. जिल्हाधिकारी, सर्व
१९. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
२०. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी), मुंबई
२१. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व).
२२. निवडनस्ती, नवि-३४.